Jagdamba Education Society's

**Santosh N. Darade Polytechnic**

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

*** Central Library ***

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 05/04/2025**

# Activity Name: Day Special

# दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

## दिनविशेष



### महिलांच्या उद्धारक पंडिता रमाबाई

पंडिता रमाबाई म्हणजे स्त्रियांच्या-विशेषत: परित्यक्त्या, पतिता व विधवांच्या-सर्वांगीण उद्धाराकरिता समर्पित भावनेने कार्यरत राहिलेल्या महाराष्ट्रीय विदुषी होत्या. त्यांचा जन्म २३ एप्रिल १८५८ रोजी मंगलोरजवळ माळहेरंजी येथे राहणाऱ्या अंबाबाई आणि अनंतशास्त्री डोंगरे या दाम्पत्यापोटी झाला. अनंतशास्त्री यांनी रमाबाईंना वेदादींचे शिक्षण दिले. तसेच रमाबाई नऊ वर्षांच्या झाल्या, तरी त्यांचे लग्न करून दिले नाही म्हणून ज्ञातिबांधवांनी त्यांना वाळीत टाकले. रमाबाईंनी संस्कृतमध्ये तर प्रावीण्य मिळविले होतेच, पण मराठी, हिंदी, बंगाली आणि कन्नड भाषाही त्या अस्खलितपणे बोलू शकत होत्या. १८७८ साली त्यांचे बंधू श्रीनिवासशास्त्री यांच्यासह प्रवास करीत त्या कोलकात्याला आल्या. तेथे मात्र त्यांच्या विद्वत्तेचा व बुद्धिमत्तेचा उचित गौरव झाला. कोलकात्याच्या सिनेट हॉलमध्ये त्यांना 'पंडिता' व 'सरस्वती' या बिरुदावली बहाल करण्यात येऊन त्यांचा गौरव करण्यात आला. 'पंडिता' नावाने ओळखल्या जाणाऱ्या रमाबाई या आज एकमेव महिला होत.

बंगाली स्त्रियांनीही त्यांना 'भारतवर्षीय स्त्रियांचे भूषण' म्हणून मानपत्र दिले. बाल-विवाह, पुनर्विवाहास बंदी इ. घातक चालीरीती व दुष्ट रुढी यांतून समाजास मुक्त करण्याच्या उद्देशाने त्यांनी प्रथम पुणे येथे व नंतर अहमदनगर, सोलापूर, ठाणे, मुंबई, पंढरपूर, बार्शी इ. ठिकाणी 'आर्य महिला समाजा'ची स्थापना केली. स्त्रीधर्मनीति (१८८२) हे पुस्तक त्यांनी लिहिले. अत्यंत बुद्धिवान असलेल्या रमाबाईंचे अंतःकरण अत्यंत उदार व दीनदुबळ्या स्त्रियांकरिता सतत तळमळणारे होते. अशा या महान समाजसेविकेचे ५ एप्रिल १९२२ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Apr 05, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401